**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
**AURANGABAD -431 004 Maharashtra, India**
**NAAC Re-accredited "A" Grade**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद-४३१ ००४ महाराष्ट्र ,भारत**
**नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त**

स्थापना वर्ष-१९५८

P.G.Admission Section — पदव्युत्तर प्रवेश विभाग

PG. Office :- (0240) 2403123 WEB SITE : www.bamu.ac.in http://bamua.digitaluniversity.ac. E-mail : pgsection@bamu.ac.in

## पदव्युत्तर प्रवेश २०१८-२०१९ परिपत्रक

महोदय/ महोदया,

या परिपत्राव्दारे सर्व शैक्षणिक पदव्युत्तर विभाग प्रमुख विद्यापीठ परिसर औरंगाबाद, शैक्षणिक पदव्युत्तर विभाग उप-परिसर, उस्मानाबाद, (सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रम), प्राचार्य समाजकार्य महाविद्यालय, विद्यापीठ परिसर, औरंगाबाद तसेच प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालय (केवळ विज्ञान व वाणिज्य पदव्युत्तर अभ्यासक्रम असणारे) यांना कळविण्यात येते की, आपल्या शैक्षणिक विभाग व महाविद्यालयामध्ये दि. ०३ जुलै २०१८ रोजी आयोजित तात्काळ प्रवेश प्रक्रियेनंतरही संबंधीत अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त राहिल्यास या रिक्त जागेवर प्रवेशपूर्व परीक्षा-२०१८-२०१९ न दिलेल्या व इतर विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आपल्या शैक्षणिक विभाग व महाविद्यालय स्तरावर ऑफलाईन पध्दतीने प्रवेशपूर्व परीक्षा आयोजित करुन गुणवत्ता व आरक्षण नियमानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावेत.

### ऑफलाईन प्रवेशपूर्व परीक्षा वेळापत्रक -२०१८-२०१९

| | | |
|---|---|---|
| ०१. | संबंधीत शैक्षणिक विभाग व महाविद्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये ऑफलाईन नोंदणी करण्याचा कालावधी | दि.०४ जुलै २०१८ ते दि.०९ जुलै २०१८ |
| ०२. | ऑफलाईन परीक्षेचा दिनांक व वेळ | दि. १० जुलै २०१८ वेळ :- ११.०० ते १२.०० |
| ०३. | गुणवत्ता यादी जाहिर करण्याचा दिनांक व वेळ | दि.१० जुलै २०१८ वेळ : सायंकाळी ५.०० वाजता |
| ०४. | विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा दिनांक | दि. ११ जुलै २०१८ (कार्यालयीन वेळेत) |
| ०५. | नियमित वर्ग सुरु करणे. | दि. १२ जुलै २०१८ |

**ही प्रवेश प्रक्रिया राबवितांना खालील नियमाचे काटेकोर पालन करावे.**

१. या प्रवेशपूर्व परीक्षेसाठी संबंधित शैक्षणिक विभाग/ महाविद्यालयाने स्वतः हा वस्तुनिष्ठ ५० प्रश्नांचा १०० गुणांचा प्रश्नसंच तयार करावा यामध्ये निगेटिव्ह मार्किंग न ठेवता प्रवेशपूर्व परीक्षेच्या गुणवत्तेवर व आरक्षणानुसार (गुण समान झाल्यास १२ वी व तेही समान झाल्यास १० वी चे गुण विचारात घ्यावे.) प्रवेश देण्यात यावेत.

२. प्रवेशपूर्व परीक्षा घेऊन गुणवत्ता यादी जाहिर करावी. गुणवत्ता व आरक्षण नियमानुसार रिक्त जागेवर प्रवेश देण्यात यावेत.

३. परीक्षेसाठी नोंदणी शुल्क खुला प्रवर्ग रु. २००/- व राखीव प्रवर्गासाठी रु. १००/- आकारण्यात यावेत.

४. प्रवेशपूर्व परीक्षेशिवाय कोणताही प्रवेश देण्यात येऊ नये.

५. अंतिम झालेले प्रवेश व प्रवेशपूर्व परीक्षेचा वस्तुनिष्ठ अहवाल विद्यापीठ प्रशासनास (पदव्युत्तर प्रवेश विभाग) दि. २० जुलै २०१८ पर्यंत pgsection@bamu.ac.in या ईमेल वर सॉफ्ट कॉपी व हॉर्ड कॉपीसह पाठविण्यात यावेत.

विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद ][
परिपत्रक क्रमांक-१२ ][
वि.प.प्र.वि./२०१८-२०१९/2806 ][
दिनांकः- ०३ जुलै २०१८ ][

प्र. कुलगुरु

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Aurangabad ★